वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.०, राज्यस्तरीय नोडल यंत्रणेची आठवी बैठक दिनांक १६.१०.२०२३ रोजी संपन्न झाली.

सदर बैठकीस खालील अधिकारी व सदस्य उपस्थित होते.

श्री. एकनाथ डवले (भा. प्र.से.), प्रधान सचिव, मृद व जलसंधारण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
श्री. वि. बा. नाथ, मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे तथा महासंचालक, वाल्मी, छत्रपती संभाजीनगर.
श्री. सुनील चव्हाण, आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे (व्ही. सी. द्वारे)
आयुक्त, मनरेगा, नागपुर (व्ही.सी. द्वारे)
श्री. सु. म. काळे, सहसचिव, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई
श्री. रविंद्र भोसले, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे
श्री. ऋषि राज गोसकी, संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांचे प्रतीनिधी (व्ही.सी. द्वारे)
श्री. श्रीराम गवई, कार्यासन अधिकारी, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
श्री. श्रीनिवास जिरेवार, कक्ष अधिकारी, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
ॲड. श्री. अमित गीते, अध्यक्ष, श्री एकलव्य सेवाभावी संस्था, परभणी.
श्री. यशवंत पांडे, सचिव, अश्वमेघ ग्रामीण पाणलोट क्षेत्र विकास व शैक्षणिक संस्था, फत्तेपूर.
श्रीमती सुमिता घाडगे, अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

SLSC Annuction

PPT

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि.१ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या सातव्या बैठकीचे इतिवृत्तास मान्यता देणे. | राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि.१ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या सातव्या बैठकीचे इतिवृत्ताचे व सदर बैठकीत झालेल्या निर्णयावर केलेल्या अथवा कार्यवाहीत असलेल्या बाबी समितीस अवगत करून देण्यात आल्या.<br>चर्चे दरम्यान मृद व जल संधारण विभाग कार्यारंभ आदेश क्र. राकृयो२०२२/प्र.क्र. ३७/जल-८, दि. १२.०९.२०२३ अन्वये दि. ३१ मार्च २०२६ किंवा प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० या योजनेचा कालावधी यापैकी जे कमी असेल त्या कालावधीत कंत्राटी तत्वावर राज्य, जिल्हा व प्रकल्प स्तरावरील कंत्राटी मनुष्यबळ पुरवठा करणेकरिता मे. अॅक्सेंट टेक सर्व्हिसेस ली. या संस्थेस कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे व सदर संस्था नेमणुकीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत विनंती करण्यात आली. | मृद व जल संधारण विभाग कार्यारंभ आदेश क्र. राकृयो२०२२/प्र.क्र. ३७/जल-८, दि. १२.०९.२०२३ अन्वये दि. ३१ मार्च २०२६ किंवा प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० या योजनेचा कालावधी यापैकी जे कमी असेल त्या कालावधीत कंत्राटी तत्वावर राज्य, जिल्हा व प्रकल्प स्तरावरील कंत्राटी मनुष्यबळ पुरवठा करणेकरिता मे.अॅक्सेंट टेक सर्व्हिसेस लि. या संस्थेस कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. सदर संस्था नेमणुकीस कार्योत्तर मान्यतेसह राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या दि. १ ऑगस्ट २०२३ रोजीच्य सातव्या बैठकीचे इतिवृत्तास समितीने मान्यता देण्यात आली. | | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| २ | राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या (SLTC) बैठकीत मान्यता मिळालेल्या सविस्तर प्रकल्प अहवालांना मान्यता प्रदान करणे. | राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या दि. १५.०९.२०२३ रोजी पार पाडलेल्या ६ व्या बैठकीत २० सविस्तर प्रकल्प अहवालांना (DPR) व दि. १३.१०.२०२३ रोजी पार पडलेल्या ७ व्या बैठकीत १५ सविस्तर प्रकल्प अहवालांना (DPR) अशा एकूण ३५ सविस्तर प्रकल्प अहवालांना (DPR) राज्यस्तरीय तांत्रिक समितीने शिफारस करण्यात आलेली आहे. सदरच्या सविस्तर प्रकल्प अहवालांना मान्यता देणेस्तव चर्चा झाली. | राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या ६व्या व ७ व्या बैठकीत अनुक्रमे २० व १५ असे एकूण ३५ शिफारस केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालांना (DPR) परिशिष्ट अ मधील तपशीलाप्रमाणे मान्यता देण्यात आली.<br>रायगड, पालघर, बुलढाणा, चंद्रपूर या जिल्ह्यातील सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) मोठ्या संख्येने अपूर्ण आहेत ते तातडीने संबंधित जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी पूर्ण करून घेऊन जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC) यांची मान्यता घेऊन राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या (SLTC) मान्यतेसाठी सादर करणेबाबतच्या सूचना समितीने दिल्या. | प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी व प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा. | १५ दिवस |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ३ | NRM & Governance Plan या घटकाच्या अंमलबजावणीसाठी उपक्रम निश्चित करणे. | १)NRM & Governance Plan या घटकांतर्गत उपलब्ध असलेल्या २% निधीतून राबवावयाच्या उपक्रमाविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये पाणलोट समिती स्तरावर गावांतर्गत तयार होणारी उपचाराची कामे व मालमत्ता यांचे नोंदणी साठी Watershed Asset Register तयार करून ते सातत्याने अद्यावत करणे याबाबत चर्चा करण्यात आली.<br>२) पाणलोटातील सर्व गावांमध्ये अटल भूजल योजनेच्या धर्तीवर वर्षातून २ वेळा पाणी पातळी मोजण्यासाठी Water Level Sounders व गावांमध्ये पडणारा पाऊस मोजण्यासाठी पर्जन्य मापक यंत्र यांची मागणी करण्यासंदर्भात चर्चा झाली. सदरची दोन्ही उपकरणे गावातील पाणलोट समितीकडे ठेवण्यात येऊन त्या माध्यमातून गावात पडणारा पाऊस व पावसाळयापूर्वी आणि पावसाळ्यानंतर उपळब्ध असलेल्या | केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना २०२१ मधील मुद्दा क्रमांक. १७.१ मध्ये केलेल्या मार्गदर्शनानुसार NRM & Governance Plan या घटकांतर्गत उपलब्ध असलेल्या २% निधीतून खालील बाबी राबवण्यास मान्यता देण्यात आली.<br>१) पाणलोट समितीस्तरावर Watershed Asset Register चा नमूना वसुंधरा कार्यालयाने तयार करून देणे. सदर Register जिल्हा स्तरावरून तयार करून घेऊन पाणलोट समितीला उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. त्यासाठी उपलब्ध निधीतून खर्च करण्यास मान्यता देण्यात आली.<br>२) अटल भूजल योजनेच्या | वसुंधरा कार्यालय, प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | पाण्याची पातळी मोजण्यात येऊन त्या प्रमाणे गावातील पिकांचे नियोजन करणे शक्य होईल अशी चर्चा सभेमध्ये झाली.<br>३) विविध तक्त्यांच्या माध्यमातून गावातील समुदाय सभागृहामध्ये माहिती केंद्र तयार करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.<br>४) पाणलोटातील प्रत्येक गावातील ग्रामस्थांना पाण्याचा ताळेबंद तयार करणे, पाणी पातळी मोजणे, पाण्याच्या उपलब्धतेनुसार पिकांचे नियोजन करणे यासंबंधी गाव पातळीवर तज्ञांच्या माध्यमातून प्रशिक्षणे घेण्यासंदर्भात चर्चा झाली. | धर्तीवर गावामध्ये पाणी पातळी मोजण्यासाठी Water Level Sounder व पाऊस मोजण्यासाठी पर्जन्य मापक यंत्र याची उभारणी करण्यास मान्यता देण्यात आली.<br>३) पाणलोटातील प्रत्येक गावात गावाच्या हवामानाच्या, PMKSY WDC २.० अंतर्गत केलेल्या उपचारांची तसेच पाणलोटाच्या संपूर्ण माहिती देणारे तक्त्यांच्या मदतीने समुदाय सभागृहामध्ये प्रदर्शित करून माहिती केंद्र तयार करण्यास समितीने मान्यता दिली.<br>४) पाणलोटातील प्रत्येक गावातील ग्रामस्थांना पाण्याचा ताळेबंद तयार | | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | | करणे, पाणी पातळी मोजणे, पाण्याच्या उपलब्धतेनुसार पिकांचे नियोजन करणे यासंबंधी गाव पातळीवर भूजल तज्ञांच्या माध्यमातून प्रशिक्षणे घेण्यास समितीने मान्यता दिली. | | |
| ४ | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत सन २०२२-२३ पासून लेखा परीक्षण व लेखांकन करणे करिता करावयाच्या सनदी लेखापालाच्या नियुक्तीबाबत. | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात रु ८३.४७ कोटी एवढा निधी प्राप्त झाला होता त्यापैकी रु. ६६.४७ कोटी एवढा निधी खर्च झाला. सदर खर्च मुख्यत्वेकरून राज्य व जिल्हास्तरावर झाला आहे. सदर खर्चाचे लेखापरीक्षण अद्याप प्रलंबित असल्यामुळे केंद्र शासनास देखील लेखापरीक्षण अहवाल सादर करण्यात आलेला नसलेबाबत अपर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बैठकीत माहिती देऊन सदर कालावधीतील खर्चाचे | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात प्राप्त झालेला निधी व त्यानुषंगाने झालेला खर्च याचे लेखांकन व लेखापरीक्षण करणे करिता शासनाने निश्चित केलेल्या पॅनल वरील सनदी लेखापालांकडून विहित लेखा पद्धतीचा अवलंब करून दर पत्रके मागवून त्या द्वारे सनदी लेखापालाची नियुक्ती करून | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा. | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | लेखांकन व लेखापरीक्षण होणे आवश्यक असल्याचे सांगितले. सन २०२२-२३ या वर्षातील मुख्यत्वे खर्च हा राज्य व जिल्हास्तरावरील असले कारणाने लेखांकन व लेखापरीक्षण करणे करिता दर पत्रकाद्वारे विहित लेखा पद्धतीचा अवलंब करून शासनाने निश्चित केलेल्या पॅनल वरील सनदी लेखापालकडून करून घेणे योग्य राहील अशी चर्चा बैठकीमध्ये झाली. तसेच सन २०२३-२४ या वर्षापासून मात्र लेखांकन व लेखापरीक्षण करण्या करिताचे दर हे सदर योजनेस प्राप्त झालेल्या अनुदान वितरण व खर्च करण्याच्या पद्धतीवर ठरविण्याबाबत चर्चा झाली. त्यानुसार लेखांकन व लेखापरीक्षणाकरिता सुधारित दर निश्चित करून निविदा प्रसिद्ध करण्यात यावी व सदर बाबीकरिता तांत्रिक सल्लागार नेमण्यात यावा अश्या सूचना मा.अध्यक्षांनी दिल्या. | लेखांकन व लेखापरीक्षण कार्यवाही पूर्ण करणेबाबत निर्णय घेण्यात आला.<br>सन २०२३-२४ या वित्तीय वर्षापासून मात्र लेखांकन व लेखापरीक्षणाकरिता द्यावयाचे दर हे सदर योजनेस प्राप्त झालेले अनुदान वितरण व खर्च करण्याच्या पद्धतीवर ठरविणे व अनुदान वितरण पद्धतीमध्ये PFMS प्रणालीवर झालेल्या आमुलाग्र बदलामुळे लेखांकन व लेखापरीक्षण करिता सुधारित दर निश्चित करून निविदा प्रसिद्ध करण्यात यावी व सदर बाबीकरिता तांत्रिक सल्लागार नेमण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला. | | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ५ | प्रधान मंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उपजीविका घटक महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या मदतीने राबविणेबाबतच्या मार्गदर्शक सुचनांना कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत | १)महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचे मदतीने प्रधान मंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उपजीविका घटक राज्यात राबवित असताना महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत खेळते भांडवल रु. ३००००/- दिले जाते त्याएवजी ते रु. ५००००/- वितरित करण्यासंदर्भात केंद्र शासनाच्या प्रधान मंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० च्या उपजीविका घटकाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये मान्यता देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व वसुंधरा कार्यालय यांनी संयुक्तपणे उपजीविका घटक राबविणेबाबतच्या मार्गदर्शक सूचना तयार केल्या आहेत. त्या अनुषंगाने बदल करणे आवश्यक असून क्षेत्रीय स्तरावरील अंमलबजावणी यंत्रनेस याबाबत कळवून | १) प्रधान मंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उपजीविका घटक महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या मदतीने राबविणेबाबतच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये खेळते भांडवल रु ३००००/- ऐवजी केंद्र शासनाच्या प्रधान मंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० च्या उपजीविका घटकाच्या मार्गदर्शक सूचनामध्ये मान्यता दिल्यानुसार रु. ५००००/- एवढे वितरित करण्यास मान्यता देण्यात आली व तसा बदल वसुंधरा कार्यालय व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांनी तयार केलेल्या मार्गदर्शक सुचनांमध्ये करणेत यावा असा निर्णय घेण्यात आला. | १)महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व त्यांची क्षेत्रीय स्तरावरील अंमलबजावणी यंत्रणा.<br>२)प्रधान मंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० व त्यांची क्षेत्रीय स्तरावरील अंमलबजावणी यंत्रणा. | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | त्या अनुषंगाने उपजीविका घटक राबविणेबाबत सूचना देणेत याव्यात अशी चर्चा झाली.<br>२) प्रधान मंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उपजीविका घटक महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या मदतीने राबविणेबाबतच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये पात्र स्वयं सहाय्यता गटांच्या निवडीस संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रातील पाणलोट समितीची मान्यता असणे आवश्यक असेल असे नमूद केले आहे. परंतु केंद्र शासनाकडून निधीचा पुढील हप्ता तात्काळ प्राप्त करून घेणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांना वसुंधरा कार्यालयाने निधी वर्ग केला असून त्यांनी त्यांच्या क्षेत्रीय स्तरावरील यंत्रणेमार्फत स्वयं सहाय्यता गट व प्रभाग संघ यांना Livelihood Action Plan तयार | २) प्रधान मंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उपजीविका घटक महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या मदतीने राबविणेबाबतच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये पात्र स्वयं सहाय्यता गटांच्या निवडीस संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रातील पाणलोट समितीची मान्यता घेतली नसल्यास पाणलोट समितीची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी, असा बदल करणेबाबतचा निर्णय घेण्यात आला.<br><br>३) वरील १ व २ मध्ये नमूद केलेल्या बदलांसहित प्रधान मंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उपजीविका घटक महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या मदतीने राबविणेबाबतच्या | | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | होण्याच्या अधिन राहून निधी वितरित केला असले कारणाने पाणलोट समितीची कार्योत्तर मान्यता घेणे असा बदल प्रधान मंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उपजीविका घटक महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या मदतीने राबविणेबाबतच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये करून त्याबाबत क्षेत्रीय अमलबजावणी यंत्रणेस कळविणे आवश्यक असल्याबाबत चर्चा करण्यात आली.<br>३) वरील १ व २ मध्ये नमूद केलेल्या बदलांसह प्रधान मंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत उपजीविका घटक महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या मदतीने राबविणेबाबतच्या मार्गदर्शक सुचनांना समितीने कार्योत्तर मान्यता देण्याबाबत चर्चा करण्यात आली. | मार्गदर्शक सुचनांना समितीने कार्योत्तर मान्यता दिली.<br>४) प्रकल्पाचा उपजीविका घटकसंबंधीचा Livelihood Action Plan तयार करून त्या संबंधित ग्रामपंच्यातीतील पाणलोट समिती, ग्रामसभा, जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र यांच्या मान्यता घेऊन राज्यस्तरावर मान्यतेसाठी पाठविण्यात यावा. तसेच हा Livelihood Action Plan हा सविस्तर प्रकल्पाचाच एक भाग असेल असे निर्देश देण्यात आले. | | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | ४) प्रकल्पाचा उपजीविका घटकसंबंधीचा Livelihood Action Plan तयार करून राज्यस्तरावर मान्यता घेणेबाबत चर्चा करण्यात आली. | | | |
| ६ | मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने आयत्या वेळचे विषय. | १)श्री. राजेंद्र नाईकनवरे, सहाय्यक लेखाधिकारी या पदावर कंत्राटी तत्वावर PMKSY WDC १.० मध्ये कार्यरत होते. सद्यस्थितीत त्यांचे वय ६७ वर्षे असल्यामुळे ते कंत्राटी तत्वावर घ्यावयाच्या वयाच्या पात्रतेत बसत नाहीत. तथापि त्यांना PMKSY WDC १.० चा अनुभव असल्याने दि. ३१-०५-२०२३ च्या राज्यस्तरीय नोडल यंत्रणेच्या बैठकीत श्री. नाईकनवरे यांना वयाची अट शिथिल करून माहे सप्टेंबर २०२३ पर्यंत कंत्राटी तत्वावर नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आलेली होती. त्यांनी सदर कालावधीत सहाय्यक लेखाधिकारी या कंत्राटी पदावर नव्याने येणाऱ्या उमेदवारास त्यांचेकडील सर्व | १) श्री. नाईकनवरे यांना माहे डिसेंबर २०२३ पर्यंत कंत्राटी तत्वावर नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आली. | वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा. | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | कामकाज व्यवस्थित समजावून सांगावे असे निर्देश देण्यात आले. तथापि अद्यापही कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती न झाल्याने व कार्यालयातील कामाचा व्याप पाहता श्री. नाईकनवरे यांना माहे डिसेंबर २०२३ पर्यंत कंत्राटी तत्वावर नियुक्ती देण्यास मान्यता देणेबाबत चर्चा करण्यात आली. | | | |
| | | २) DRO, PTO, LRA यांच्या प्राप्त प्रस्तावांची छाननी प्रक्रिया वाल्मी स्तरावर चालू असून संस्थांचे सादरीकरण करून घेण्यात येत असून सदर प्रक्रिया अंतिम टप्यात आली असलेबाबत महासंचालक, वाल्मी यांनी समितीस सांगितले. समिती सदस्य ॲड. श्री. गीते व श्री पांडे यांनी या प्रक्रियेबाबत समाधान व्यक्त केले. लवकरात लवकर संस्थांचे गुणांकंन करून यादी वसुंधरा कार्यालयामार्फत शासनाकडे अंतिम निर्णयासाठी पाठविणेबाबत मा. अध्यक्षांनी महासंचालक, वाल्मी यांना | २) DRO, PTO, LRA यांच्या प्राप्त प्रस्तावांची छाननी प्रक्रिया पूर्ण करून संस्थांच्या गुणांकनाची यादी वसुंधरा कार्यालयामार्फत शासनाकडे अंतिम निर्णयासाठी ऑक्टोबर अखेरपर्यंत पाठवण्यात यावी असे निर्देश समितीने दिले. | १) वाल्मी, औरंगाबाद.<br>२)वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा. | |

| अ.क्र. | विषय | बैठकीतील चर्चा | बैठकीतील निर्णय | अंमलबजावणी यंत्रणा / अधिकारी | अंमलबजावणी पुर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | निर्देश दिले. DRO, PTO, LRA यांची नेमणूक लवकरात लवकर करून त्यांच्या मार्फत गावं पातळीवरील प्रशिक्षणे पूर्ण करणे आवश्यक असलेबाबत मा. अध्यक्षांनी महासंचालक, वाल्मी यांना निर्देश दिले. तसेच स्वयंसेवी संस्थांची PIA नेमणुकीबाबत देखील लवकर निर्णय घेण्यात यावा अशी विनंती ॲड. श्री. गीते व श्री पांडे यांनी मा. अध्यक्षांना केली. | | | |

वरील प्रमाणे सर्व संबंधितांनी तात्काळ कार्यवाही करावी. उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

(वि.बा. नाथ)
सदस्य सचिव, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे

(एकनाथ डवले)
अध्यक्ष, राज्यस्तरीय नोडल यंत्रणा तथा प्रधान सचिव,
मृद व जलसंधारण,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई